**महाराष्ट्र शासन**

क्रमांक : व्हीएलएस १०००/(५५७/२०००)/(१)/प्राशि -३
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ४ एप्रिल, २००१.

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
विभाग.

**विषय : सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात विना अनुदान तत्वावर खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देणेबाबत .**

सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षी परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीतील शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त इतर माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना विना अनुदान तत्वावर प्राथमिक शाळा सुरु करण्यास जून २००० पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे. परवानगी देण्याविषयीचा शासनाचा निर्णय संबंधित संस्थांना तात्काळ कळविण्यात यावा.

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : व्हीएलएस १०००/(५५७/२०००)/(१)/ प्राशि-३ दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तींवर देण्यात येत आहे.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच शासनपत्र दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

विवचिंदरकर

( वि.क.चिंदरकर )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
१) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद.
३) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी अग्रेषित
४) मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी अग्रेषित

( सन २०००-२००१ या वर्षी(जून २००० पासून) इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त इतर माध्यमाच्या नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनपत्र क्रमांक व्हीएलएस २०००/(५५७/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक : ४ एप्रिल, २००१ चे सहपत्र )

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | माध्यम |
|---|---|---|---|
| | **जिल्हा - औरंगाबाद** | | |
| १. | जायंट्स ग्रुप ऑफ वाळुज, जायंट्स सेवा केंद्र, वाळुंज, गंगापूर, औरंगाबाद | वाळुंज, गंगापूर, औरंगाबाद | मराठी |
| २. | रामदेवजीबाबा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद | औरंगाबाद, जि. औरंगाबाद | मराठी |

(शिक्का)

६) मा. सचिव ( शालेय शिक्षण , यांचे स्वीय सहायक

निवड नस्ती, प्राशि-३